पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक : 18 MAY 2022
Date :

## सुधारीत परिपत्रक क्र. - 28 /२०२२

**संदर्भ क्र. :** १) प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १७ जावक क्र. पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/वेळापत्रक/२०२२/३६३ दि.२४ मार्च २०२२.
२) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली दि.२५/०४/२०२२ रोजीची बैठक.
३) परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक दि.१७/०५/२०२२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१२ नुसार
४) परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक दि.१७/०५/२०२२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१४ नुसार

वरील संदर्भ क्र.१ नुसार प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र.१७ दि.२४/०३/२०२२ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/प्राचार्या व संचालक/विभागप्रमुख सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना या परिपत्रकाव्दारे माहे मार्च/एप्रिल-२०२२ मधील सर्व विद्याशाखांतर्गत पदवी सत्र १ ते ६ व पदव्युत्तर सत्र १ ते ४ या अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया ऑनलाईन व ऑफलाईन अशा संमिश्र पध्दतीने (Blended Mode of Exam) आयोजित होणार असल्याचे कळविण्यात आलेले होते.

वरील संदर्भ क्र. २ व ३ नुसार मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२५/०४/२०२२ रोजी सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुसमवेत महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षेच्यासंदर्भात दूरदृश्य प्रणालीव्दारे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विद्यापीठातील परीक्षेत एकसमानता असावी यासाठी सर्वच विद्यापीठांनी सन २०२२ मधील सम सत्राच्या व इतर परीक्षा (पदवी/पदव्युत्तर) या ऑफलाईन पध्दतीने घ्याव्यात, अशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळच्या बैठकीतील ठराव क्र. १२ अन्वये **परिपत्रक क्र.१७ दि.२४/०३/२०२२ रोजीचे परिपत्रक रद्द करण्यात आलेले आहे.**

वरील संदर्भ क्र. २ व ४ नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/प्राचार्या, व संचालक/विभागप्रमुख सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२५/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंसमवेत झालेल्या बैठकीतील सूचनेनुसार तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळच्या बैठकीतील ठराव क्र. १४ अन्वये **मार्च/एप्रिल-२०२२ मधील सर्व विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया ऑफलाईन (Offline) पध्दतीने दि.१५ जून २०२२ पासून आयोजित करण्यात येणार आहेत.** तरी सदरचे परिपत्रक परीक्षेशी निगडीत सर्व घटकांच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

**(डॉ. शिवकुमार गणपूर)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत-वरीलप्रमाणे**
**जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन /वेळापत्रक/२०२२/** 569
**दिनांक :** 18 MAY 2022

**प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

१. मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. परीक्षा विभागातील उपविभाग, प्रस्तुत विद्यापीठ.